# तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर

## कुळकायदा संकलन

दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७३१०३३ Email- tahsouthsolapur@gmail.com

क्र.२०२३/कु.का./कावि/ २६७ /२३ दिनांक :- २०/०७/२०२३

वाचा :- मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील पत्र जा.क्र. कु.का./कार्या-२/कोतवाल/आरआर-७७९/२३ दिनांक १८/०७/२०२३

**सुचनापत्र :-**

सर्व नागरिकांना याद्वारे सुचित करणेत येते की, मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेंकडील वाचानुसार दक्षिण सोलापूर तालुक्यातील रिक्त कोतवाल पदे भरती करणेबाबत मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार दक्षिण सोलापूर तालुक्यातील ०७ तलाठी साझ्यांकरिता कोतवाल पदे भरवयाची आहेत.

भरावयाच्या कोतवाल पदाचे साझा निहाय आरक्षण पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साझाचे नाव | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| 1 | वळसंग | अनुसुचित जाती (महिला) |
| 2 | सिंदखेड | अनुसुचित जमाती (महिला) |
| 3 | मुस्ती | भटक्या जमाती (ब) |
| 4 | हत्तुर | भटक्या जमाती (ड) |
| 5 | बोरामणी | इतर मागास वर्ग |
| 6 | तोगराळी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 7 | वडकबाळ | अनुसुचित जमाती |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसहीत अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहित दिनांक २४ जुलै २०२३ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत (सुटीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर यांचे कार्यालयात कुळकायदा शाखेत सादर करावेत व त्याबाबत पोहोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसिल कार्यालयातील कुळकायदा शाखेत कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध आहे. विहीत तारखेनंतर येणाऱ्या तसेच अपुर्ण भरलेल्या अर्जाचा व जाहीरनाम्यापुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक**

१) अर्ज व आवश्यक कागदपत्र पुराव्यासहित दिनांक २४ जुलै २०२३ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथे सादर करावेत.

२) अर्जाची छाननी दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ व ०२ ऑगस्ट, २०२३ रोजी कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथे करणेत येईल. परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादीची प्रसिध्दी दिनांक ०२ ऑगस्ट २०२३ दिवशी तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूरचे नोटीस बोर्डवर लावण्यांत येईल.

३) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा रविवार दिनांक ०६ ऑगस्ट २०२३ रोजी घेण्यात येईल. परिक्षेचे स्थळ व वेळ यथावकाश प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अंर्जाची पोचपावतीसह परिक्षेस उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

४) सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य,कॅल्क्युलेटर, मोबाईल इत्यादी घेऊन बसता येणार नाही.

## कोतवाल भर्तीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे

१) पात्र उमेदवारांची १०० गुणांची वस्तूनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्नांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांची प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवांराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२) उमेदवाराने अर्जासोबत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराचे वय जाहीरनाम्याच्या दिनांकाला कमीत कमी 18 वर्षे व जास्तीत जास्त 40 वर्षे या दरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / मतदान कार्ड / शाळा सोडल्याचा दाखला / ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

४) उमेदावाराची शैक्षणिक पात्रता 4 थी पास असणे आवश्यक आहे.

५) निवड झालेल्या उमेदवारांने शारीरिक क्षमतेबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / जिल्हा मेडीकल बोर्डाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल. एक महिन्यात प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

६) उमेदवाराने चारित्र्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती नंतर एक महिन्याचेआत सादर करावे लागेल. एक महिन्यात प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

७) सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच उमेदवाराला नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्व सुचना न देता कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी नियुक्ती रद्द (समाप्त) करण्यात येईल. (आरक्षणाचे पदाबावतीत)

८) अर्जासोबत कोणत्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कोणताही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल.

९) अर्जदाराने स्वत: वैयक्तीक हजर राहुन अर्ज सादर करावा. अर्ज पोस्टाद्वारे पाठविण्यात येवु नये.

१०) अपुर्ण भरलेले अर्ज रद्द करण्यात येतील. त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही.

११) अर्जामधील माहिती खोटी आढळल्यास अर्ज रद्द करणेत येईल. किंवा नियुक्ती झाल्यानंतर ही नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१२) कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.

१३) कोतवाल पदासाठी होणारी परिक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.

१४) विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथे रु. 50/- शुल्क भरुन उपलब्ध

होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येतील.)

१५) ज्या उमेदवाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवारांची 100 गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी 50 प्रश्नांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. त्यानुसार सदर लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांची प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१६) जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसगंत असल्यास शासन निर्णय अंतीम राहील.

१७) परिक्षा शुल्क :- उमेदवारांनी खालील प्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | मागास प्रवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रु. 300/- (रु. तीनशे फक्त) | रु. 400/- (रु. चारशे फक्त) |

१८) उमेदवाराला निवडप्रक्रियेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

वरील सर्व अटी व शर्तींना अनुसरुन निवड समितीचा व मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचा निर्णय अंतिम राहील.

दिनांक :- २०/०७/२०२३
स्थळ :- सोलापूर

(राजशेखर लिंबारे)
**सदस्य सचिव**
**तालुका निवड समिती तथा**
**तहसिलदार,दक्षिण सोलापूर**

(मनिषा आव्हाळे) भाप्रसे
**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**सहायक जिल्हाधिकारी, सोलापूर क्र.2**

**प्रति,**

१. मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभगागीय अधिकारी सोलापूर क्र. २ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत :-**

१. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर सदर जाहिरनाम्याची एक प्रत प्रसिध्द करावी.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांनी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी.

४) मंडळ अधिकारी- बोरामणी / वळसंग / मुस्ती / मंद्रुप / औराद

५) तलाठी- बोरामणी / तोगराळी / मुस्ती / वळसंग / वडकबाळ / हत्तुर / सिंदखेड

६) ग्रामसेवक- बोरामणी / तोगराळी / मुस्ती / वळसंग / वडकबाळ / हत्तुर / सिंदखेड.

उपरोक्त नमुद अ.क्र. ४, ५, ६ यांनी सदर जाहिरातीची प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दिनांक २१/०७/२०२३ रोजी डकवून त्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी या कार्यालयास सादर करणेत यावा.